प्रकाश राऊत



# ई साहित्य

# काळाची गरज

# ई साहित्य : काळाची गरज

## प्रकाश राऊत

ई साहित्य प्रतिष्ठान

# ई साहित्य : काळाची गरज

लेखक :प्रकाश राऊत
मिनाक्षी एन्क्ल्हेव,
107 बी, स्टेट बँकेसमोर,
कँम्प अमरावती 444602
मो. : 9552543947

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com
ई प्रकाशन : ७ मे २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाश राऊत यांची ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित पुस्तके

1. नोकरशाहीतील बाळूच्या गमतीजमती

2. आजच्या जगात वावरताना

3. ई साहित्य काळाची गरज

©प्रकाश राऊत

मिनाक्षी एन्क्लेव्ह 107 बी,

कॅम्प अमरावती 444602

raut. prakash2011@gmail. com

मो. : 9552543947

# प्रकाशकाचे मनोगत

"ई साहित्य" या विषयावर श्री प्रकाश राऊत यांनी इतके विस्तृत चिंतन करून लिहिलेले पुस्तक प्रसिद्ध करताना ई साहित्यच्या टीमला आनंद होत आहे. पण समाधान नाही. खरं तर ई साहित्य प्रतिष्ठानने या विषयावर स्वतःहून काही लिहून प्रसिद्ध करायला हवं होतं. पण ते झालं नाही आणि त्याचं कारण खाली देत आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठानची टीम ही काही ई साहित्याची पाठीराखी नाही. हे ऐकून तुम्ही चकित व्हाल. पण आम्ही मराठी भाषेसाठी, आपल्या मातृभाषेसाठी काही करायचे म्हणून ई साहित्याकडे वळलो. उद्या जर आम्हाला हे जाणवले की ई साहित्य बंद केल्याने मराठीची अधिक सेवा होईल तर आम्ही तसे करू. आम्ही ई साहित्याकडे का वळलो त्याची गंमतच झाली.

आठ नऊ वर्षांपुर्वी, आम्ही, काही कवी लेखक आपली स्वतःची पुस्तकं प्रसिद्ध करायला आधी मोठमोठ्या आणि नंतर छोटछोट्या प्रकाशकांकडे गेलो. तेव्हा जाणवले की एकतर या प्रकाशकांना नवीन लेखकांसाठी फ़ारसा वेळच नाही. त्यांच्याकडे एवढे काम आहे आणि खर्चाचा ताळेबंद एवढा व्यस्त आहे की ते स्वतःच बेजार झालेले आहेत. एकतर नवीन लेखकांची (किंवा हाताच्या बोटावर मोजण्याइतके काही सोडले तर जुन्यांची सुद्धा) पुस्तके खपतच नाहीत. वाचक एकतर रेसिपी, विणकाम, विनोद अशी लाईट पुस्तके मागतात किंवा स्वामी, पुलं, मृत्युंजय, शिवाजी अशी, किंवा गुरुचरित्र, शनीमहात्म्य वगैरे. वाचकांना शंभर दोनशे खर्च करून एखाद्या अनोळखी लेखकाचे काही वाचायची हिंमत होत नाही. मग तेच ते, तेच ते असं चक्क साठेक वर्षं चालूच आहे. त्यामुळे पुढे झालंय काय की एखाद्या नवीन लेखकाची फ़ार फ़ार तर हजाराची एखादी आवृत्ती निघते. ती भेटीगाठींतच फ़स्त होऊन जाते. (म्हणजे काय ते लेखकांनाच विचारा). कवींची परिस्थिती तर त्याहूनही वाईट. प्रकाशक चक्क त्यांच्याकडेच आगाऊ पैसे मागतात.

एवढं होऊन होतंय काय? सहा कोटी साक्षरांच्या या महाराष्ट्रात आणि मराठीत वाचकांचाच दुष्काळ पडला आहे. वाचकच नाहीत तर लेखक लिहिणार

कोणासाठी? त्यामुळे दर्जेदार लेखक समोर येतच नाही. एखाद्या सुमार सिरियलमधल्या तिय्यम अभिनेत्रीला जेवढा समाजात भाव असतो तेवढाही बिचाऱ्या लेखकाच्या वाट्याला येत नाही. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाची सुद्धा कोणाला माहिती नसते. तिथे बाकीच्या लेखकांचं काय? त्यामुळे खुद्द लेखकाच्या घरातूनही त्याच्या किंवा तिच्या लेखनाचं कोणाला कौतुक नसतं. लेखनाच्या जिवावर आयुष्य काढणं तर शक्यच नाही. कुठल्यातरी नोकरीत दिवसाचे उत्साहाचे तास घालवायचे, आयुष्याची उमेदीची वर्षं घालवायची असं त्या बिचाऱ्या लेखकाचं होतं. त्याची प्रतिभा अशी गॅस संपलेल्या सोड्यासारखी पाणी होऊन जाते.

तिकडे, वाचनाची आवड असणारा वर्ग, पुस्तकं मिळतच नाहीत म्हणून हळूहळू टिव्ही सिनेमाच्या मनोरंजनात आपला काळ घालवतो. मुंबई पुणे नाशिक अशी काही शहरं सोडली तर इतर जिल्ह्यांच्या ठिकाणीही हवी ती पुस्तकं सहजासहजी मिळत नाहीत. तालुका तर सोडाच आणि बारकी गांवं तर विसरूनच जा. मग अभिरुचीहीन (किंवा हीन अभिरुची) समाज नसत्या पोकळ गोष्टींच्या आहारी जाऊ लागतो.

वाचन म्हणजे निव्वळ टाईमपास नसतो. त्यातून समाज घडत असतो. कोणता समाज कोणती (आणि किती) पुस्तकं वाचतो ते पहा आणि त्यावरून तुम्हाला त्याच्या एकूणच वैचारिकतेचा अंदाज येऊ लागेल. महाराष्ट्राला आज चांगल्या वाचनाची, त्यासाठी चांगल्या लेखकांची आणि त्यासाठी जबरदस्त वाचन चळवळीची गरज आहे. हे लक्षात आल्यावर आम्ही ई साहित्याकडे वळलो. ई साहित्य हे एक असं माध्यम दिसलं की तिथे अल्प खर्चात आम्ही करोड वाचकांपर्यंत जाऊ शकतो. महाराष्ट्राच्या दुर्गम भागात पोचू शकतो. आफ्रिकेत अंगोला किंवा मध्य आशियात कझाखस्तानमध्ये ई साहित्यचे वाचक आहेत. यात मोठमोठे लेखक, कवी कलाकार आहेत तसे मेंढपाळ आणि अक्षरओळख असलेल्या गृहिणीही आहेत. एका खेडेगांवात पुस्तकवाचनासाठी बुद्धविहारातल्या पुस्तक पेटीतली पुस्तकं चोरल्यामुळे गांवातून हाकलला गेलेला मुलगा आहे. सतत प्रवासावर असणारे सेल्स एक्झिक्युटिव्ह आहेत. परदेशांत मुलांकडे गेलेले आणि मराठी अक्षर ऐकण्यासाठी व वाचण्यासाठी कासावीस झालेले सिनियर सिटीझन आहेत. ई साहित्यला

महिन्याला काही हजार पत्रं येतात. त्याव्यतिरिक्त डायरेक्ट लेखकांना येणारी पत्रं व फ़ोन अलग.

यानं आम्ही समाधानी नाही. ही तर निसती सुरुवात मानतो. आता आमच्याबरोबर इतर सुमारे चाळीसेक मराठी ई पुस्तक प्रकाशक उभे आहेत. हळूहळू प्रतिष्ठित मोठेमोठे आणि छोटछोटे प्रकाशकही या वाटेवर येऊ लागतील. सरकारही जागे होईल. आणखी काही काळात इंटरनेटवर किमान दोनेक लाख मराठी ई पुस्तकं जमा होतील. वाचकांचा ओढा आणि ओढ वाढेल. त्यांना पर्याय मिळतील. वाचनाची आवड निर्माण होईल आणि तिला खतपाणी मिळेल. त्यातून अभिनिवेशाच्या पलिकडे जाऊन विचारांचे आणि सहृदयतेचे वारे या महाराष्ट्रात वाहतील. एक नवा महाराष्ट्र उभा राहील. मराठीची पताका जगभर जाईल. गाथा सप्तशती, महानुभाव, ज्ञानेश्वर, तुकाराम, अशी दोनहजार तिनशे (२३००) वर्षांची परंपरा लाभलेली मराठी जोमाने जगभर पसरेल. तिचे साहित्य पसरेल. तिच्या लेखकांना जागतिक स्तरावर ओळख मिळेल. मराठी ही एक नंबरची भाषा होती. आता नाही. पण पुन्हा होईल.

तेव्हा आम्ही समाधानी होऊ.

सुनील सामंत
टीम ई साहित्य

चिरंजीव आशय

सौ. मृदुला गरपाळ

या बोलक्या फुलांना

व

पत्नी सौ. रेखा राऊत आणि

असंख्य ई साहित्य वाचकांना

सहर्ष अर्पण

# लिखाणापूर्वी थोडसं.........

सर्वप्रथम मी ई साहित्य डॉट कॉमचे श्री सुनिल सामंत याचे मन:पूर्वक आभार मानतो तसेच त्यांचेसोबत काम करणाऱ्या पूर्ण टीमचेही मन:पूर्वक आभार व स्वागत. कार्यकारण सिध्दांतानुसार कारणाशिवाय कार्य घडत नाही असे म्हणतात. माझी दोन पुस्तके आतापर्यंत ई साहित्यने प्रकाशीत केलेली आहेत.

दिसामाजी काहीतरी लिहावे...... केवळ हाच उद्देश. तसं माझं हे तिसरे पुष्प मराठी लिखाणातलं. यापुर्वीची दोनही पुस्तके अनुक्रमे " नोकरशाहीतील बाळूच्या गमतीजमती" आणि " आजच्या जगात वावरताना" ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे 2015 व 2016 मध्ये जिज्ञासू वाचकांसाठी मोफत प्रकाशीत करण्यात आली आहेत. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला याचा मला फार आनंद होत आहे त्यामुळे मी ई साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व प्रतिनिधींचे व वाचकांचे मनापासून आभार मानतो. ही पुस्तके मोफत Download करण्यासाठी esahity. com या वेबसाईटवर जाणे आवश्यक आहे. त्याचा वाचकांनी फायदा घ्यावा, ही विनंती.

तसेच याव्यतिरीक्त दाने पुस्तके इंग्रजी भाषेमध्ये लिहिलेली आहेत. एक Flowering of Thoughts आणि दुसरे Digital Reader - A Need of an Hour. ही पुस्तके amazon. com वर उपलब्ध आहेत. Kindle Reader च्या Subscribers करीता ही पुस्तके मोफत वाचनासाठी उपलब्ध आहेत कारण ही Kindle Format मध्ये लिहिलेली आहेत. त्यासाठी आपल्या टॅबवर किंवा फोनवर प्रथम Play store वरून Kindle app डाउनलोड करावे म्हणजे इतरही पुस्तकाचा लाभ घेता येवू शकतो. amazon. in website वर जगातील इतरही लाखो पुस्तके मोफत वाचावयास मिळतात.

खरं तर वरील पुस्तकांपैकी Digital Reader - A Need of an Hour हे पुस्तक मराठी वाचकांसाठीही मोफत उपलब्ध व्हावे, ही ई साहित्य प्रतिष्ठानकडे मी व्यक्त केलेली ईच्छा, मी सहर्ष पूर्ण करण्याचा प्रयत्न, या पुस्तकाव्दारे करीत आहे. अट एवढीच की मी ते पुस्तक जसेच्या तसे अनुवादित करणार नाही कारण ही आपली मराठी भाषा आहे व येथे आपल्याला आपली भाषा कशीही वळविण्याचा अधिकार आहे कारण ती महाराष्ट्रात

सर्वांना सहज आकलनीय आहे. साऱ्या जगात इंग्रजी भाषेमधील पुस्तके मोफत उपलब्ध आहेत मग आपली मराठी भाषा आपण कां जागतिक पातळीवर नेवू नये. हे अत्यंत महत्वाचे कार्य तडीस नेण्यास ई साहित्य प्रतिष्ठान व त्यांचा समूह अहोरात्र प्रयत्न करीत आहे याला फूल ना फुलांच्या पाकळीची मदत हाच माझे लिखाणाचा मुख्य उद्देश आहे.

"ई साहित्य काळाची गरज", हा या पुस्तकाचा विषय आहे. याला मुख्य कारण असे की साहित्य हे अनादी काळापासून या ना त्या रूपाने या जगात अस्तित्वात आहे, ते Hard copy व हस्तलिखीताच्या स्वरूपात. पण अलिकडे विज्ञानाने केलेल्या प्रचंड प्रगतीमुळे सर्व प्रकारचे साहित्य हे Electronic उपकरणावर साठवून ठेवण्याची क्षमता व अधिकार 1971 पासून मायकेल हार्ट या व्यक्तिमुळे कायदेशीर रित्या प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे सर्वात महत्वाचा फायदा कोणता असेल तर तो असा की, सर्व पुर्वीचे साहित्य domain साहित्य म्हणून सर्वांना मोफत वाचण्यास, Gutenberg. org या वेबसाईटतर्फे उपलब्ध करण्यात आले आहेत. अशा पुस्तकांचा जगातील प्रत्येक व्यक्ति इंटरनेट माध्यमातर्फे उपयोग घेवू शकतो.

1970 पूर्वी ईंटरनेट फारसे प्रचलीत नव्हते. त्यावेळी अशा प्रकारची विधाने होती की, संपूर्ण जगाचे काम हे केवळ सहा संगणकाव्दारे होवू शकेल पण आज ते विधान कालबाहय ठरलेले आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रत्येकाच्या हातात मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप, संगणक तळहातावर नाचत आहेत. आजचा विचार केला तर जगात 105 कोटी ईंटरनेट युजर्स आहेत. आपल्या भारतातही, ईंटरनेट ॲण्ड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया यांनी केलेल्या एका सर्वेक्षणात असं दिसून आलंय की भारतात 2016 मध्ये 23 कोटी 60 लाख स्मार्ट फोनधारक असतील. 2017 पर्यंत तो 31 कोटी 40 लाख एवढा वाढलेला असण्याची शक्यता आहे. आज साहित्य हे खरोखरच तळ हातावरचं फळ झालं आहे.

अशा अनेक प्रकारची माहिती व चर्चा या पुस्तकांत करण्याचा माझा मानस आहे. मी लिखाण करीत असतांना मला सध्या असा अनुभव येत आहे की, अलीकडे बरेच वाचकांचा कल हा Electronic उपकरणावरील माहिती वाचण्याकडे आहे कारण ती सहज व मोफत उपलब्ध होते. माझे पहिले पुस्तक हे Hard Copy मध्ये ज्ञान प्रकाशन, पुणे यांचेतर्फे प्रकाशीत झाले होते पण त्यास दोन वर्षे होवून फारसा प्रति साद मिळाला नव्हता

पण तेच पुस्तक मी ई साहित्य प्रकाशनाकडे Electronic स्वरूपात प्राप्त करून दिल्यामुळे त्यास प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

यामुळे माझा लिखाणाचा आनंद वृद्धिंगत होत आहे. माझे यापुर्वीची दोन पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना आवडल्यामुळेच हे नवीन पुष्प तुमच्या हातात देत आहे. आपल्या प्रतिक्रिया मला जरूर कळवा ही विनंती.

करीता लिहिलेलं हे थोडसं... थांबवितो.

दिनांक- 17 मार्च 2016 प्रकाश राऊत, अमरावती

*******************

# अनुक्रम


1. पूर्वेतिहास

2. साहित्य निर्मिती

3. विज्ञानाची प्रगती

4. काळाचा बदल

5. साहित्याची आवश्यकता

6. ई साहित्य

7. लोकांचा वाचन कल

8. वाचन प्रवाह व उपकरणे

9. पुढे काय

10. मराठी जगत

11. प्रतिसाद

12. ई साहित्य काळाची गरज

# 1. पूर्वेतिहास

अगदी विश्व निर्मिती पूर्वी काय होते असा सर्वसामान्य माणसाच्या मनात विचार आला तर असे आढळते की, वेद वाङमयानुसार "तमआसीत्तमसा गूढमग्रे" म्हणजे या सृष्टी निर्मिती पूर्वी केवळ अंधार होता व तोही कसा होता तर तमसा म्हणजे अंधारासारखा. त्यानंतर उपनिषदानुसार "तपसो चियते ब्रम्हा" अर्थात ईश्वराच्या तपानुसार झालेली ब्रम्हाची निर्मिती. व त्यानंतर सदृश सृष्टी. या ठिकाणी मी ईश्वर हा शब्द प्रयोग, निसर्ग शक्तीसाठी वापरला आहे.

विज्ञानाच्या नियमानुसार, बिग बँग थिअरीप्रमाणे महास्फोट व प्रकाशाची निर्मिती झाली असा अभ्यास शास्त्रज्ञांनी केला आहे. यापुढे कालांतराने मानव वंशाची प्रगती अनादी काळापासून झाली असली तरी, ऋषी मुनींच्या काळात साहित्याची सुरूवात झालेली आढळते. त्या काळात ऋषी मुनी सातत्याने तपश्चर्या करायचे व त्यांना समाधीमध्ये जे काही आकलन व्हायचे ते वैखरी वाणीने ईतरांना मुखोदगत करण्यास मार्गदर्शन करायचे, असा काहीसा तो काळ होता. अर्थात त्या काळात पैशाची निर्मिती झालेली नव्हती त्यामुळे पैसा हे उपजिविकेचे साधनच नसल्यामुळे स्वार्थही जन्माला आला नव्हता. अशा वेळी आपणास जे काही कळतं ते ईतरांच्या हितासाठी उपयोगी पडावे हीच एकमेव अपेक्षा असावी हा बोध होतो. म्हणजेच झालेले आकलन मानवाच्या हितासाठी उपयोगी पडावे अर्थात स हित आकलन ते साहित्य असे मला वाटते.

आकलनाच्या दोन पध्दती त्यावेळी प्रचलीत होत्या. एक श्रुती आणि दुसरी स्मृती. श्रुती म्हणजे ऐकू आले ते आणि स्मृती म्हणजे स्मरले वा आठवले ते. खूप तपश्चर्या केल्यानंतर तपसाधक मनाच्या उच्च पातळीवर पोहोचतो व मौन धारण केले असल्याने त्यास समाधी अवस्थेत विविध नाद ऐकू येत असत, ज्यास अनाहृत नाद असे म्हणतात. याला भारतीय दर्शन शास्त्राचा आधार आहे.

अलिकडच्या विज्ञान युगात या बाबींवर विश्वास वाटत नाही. काळ बदलला की विश्वासही बदलतो असे दिसते. पण त्यासाठी एक प्रयोग आपण प्रत्यक्ष करा व नंतर आपण साहित्य निर्मिती कशी झाली याचा विचार पुढील प्रकरणात पाहणारच आहोत.

मी नाशिक येथे असतांना भारतीय विदयाधाम मध्ये योग शिक्षक हा कोर्स पूर्ण केला व त्यानंतर अमरावती येथे तीन वर्षे विनामूल्य योगाचे वर्ग घेतले त्यात साधकांना दूरचे ध्वनी कसे ऐकायचे याबाबत प्रयोग शिकविले. त्यातीलच एक प्रयोग. आपण शांत चित्ताने एका जागेवर बसा. कानाजवळ हाताचे घडयाळ ठेवा व मन एकाग्र करून ती घडयाळ कोणासही देवून हळूहळू हॉलमध्येच दूर न्यावयास सांगावे, लक्ष मात्र घडयाळीच्या टिकटिकवर असू दयावे. बघा आपणास घडयाळ दहा फुटावर नेल्यावरही टिकटिकचा आवाज ऐकू येईल. अर्थात मनाची एकाग्रता असली तर दूरध्वनी ऐकणे ही कठीण बाब नाही हेच सांगायचे आहे. सांगण्याचं तात्पर्य एवढेच की, साहित्याची सुरूवात ही वेद काळापासून झाली. संस्कृतमध्ये "विद्" या शब्दाचा अर्थ जाणणे असा होतो. तेंव्हापासूनच मानवाला साहित्याची जाण  व आवड निर्माण झाली असली पाहिजे असे वाटते आणि आजही ती तशीच टिकावी एवढयासाठीच हा ई साहित्यचा प्रपंच.

.........................



# 2. साहित्य निर्मिती

या पूर्वीच्या प्रकरणामध्ये आपण साहित्याचा पूर्वेतिहास थोडक्यात पाहला. श्रुति आणि स्मृतीमधून ऋषी मुनींना जे गवसले ते नि:स्वार्थ बुध्दीने मौखिक पाठांतराच्या माध्यमातून आजपर्यंत टिकून आहे याला मुख्य कारण विज्ञानाची प्रगती. साधारणपणे सन 1400 पासून आस्ट्रेलियातील गुटनबर्ग येथील छापखान्याच्या शोधामुळे सर्वप्रथम अशा लिखीत स्वरूपाचे ग्रंथ तयार झाले असल्याचे मी वाचले आहे. त्यापूर्वी बोरूच्या सहाय्याने ऋषी मुनीं झाडांच्या पानावर संस्कृतमध्ये साहित्य लिहित असल्याचे पुरावे आजही पुरातन वस्तु संग्रहालयात सुरक्षित ठेवल्याचे आढळतात. संस्कृतमध्ये असलेले साहित्य हळूहळू प्राकृत व नंतर मराठीमध्ये आले जी आपल्या महाराष्ट्राची भाषा आहे. साहित्याचे निर्माण होत असतांना, व्यक्ती तितक्या प्रकृती असल्याने अनेक प्रकारचे साहित्य निर्माण होत गेले. प्रथम व्यक्ती विकासाच्या दृष्टीने मंत्र, प्रार्थना, संतवाङमय व बोध ग्रंथाची मांडणी करण्यात आली असल्याचे आढळते. त्या काळात फार कमी लोकांना विद्वत्ता असल्याने अशा साहित्याचा कालांतराने विपर्यासही होत गेला व अंधश्रध्देचे झाड निर्माण झाले त्यामुळेच की काय साहित्याचे इतर प्रकार अलिकडच्या वाङमयामध्ये निर्माण झाले. त्यात प्रामुख्याने कथा, कादंबरी, विनोदी साहित्य, ललीत, काव्य, नाटके ईत्यादीचा समावेश होत गेला. पूर्वीचे साहित्य हे जास्तीत जास्त संदर्भ ग्रंथावर आधारित होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही कारण कोणीही त्यात बदल करण्याचे धाडस करीत नसत. याच कारणामुळे मानवी मन जुन्या रूढी व परंपरावर दृढ झालेले आढळते. विज्ञानाच्या विकासासोबत जर मानवी मनाच्या विकासाचा वेग तेवढाच असता तर अधिक बरे झाले असते असे कधी कधी मनाला वाटते.

आता मात्र असंख्य साहित्य निर्माण होत आहे. परंतू भाषा तज्ञांचे असे म्हणणे आहे की, मनुष्य हा Arbitrary प्राणी आहे. तो सत्यही लिहू शकतो व काल्पनिकही लिहू शकतो कारण जगाची लोकसंख्या सध्या 740 कोटीच्या आसपास पोहोचलेली आहे. जगात सध्या 6500 च्या वर एकूण भाषा आहेत. त्यात सर्वात जास्त लोकांकडून बोलल्या जात असलेली भाषा म्हणजे Mandarin Chinese. ही भाषा जगात 121 कोटी 30 लाख लोकांकडून बोलल्या जाते. एवढया मोठया लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या पुस्तकांची जगातील सध्याची संख्या गुगल आकडेवारीनुसार 12 कोटी 98 लाख एवढी झाली आहे.

आपल्या भारतात आजची लोकसंख्या 132 कोटी आहे व महाराष्ट्राची लोकसंख्या 11. 23 कोटी एवढी असून मराठी समजणा-यांची संख्या 7. 30 कोटी आहे. अर्थात एक टक्का जरी मराठी पुस्तके आपण गृहीत धरली तरी मराठी पुस्तकांची संख्या सात लाखाचे आसपास जाते. या अशा साहित्याचा सर्वांनाच फायदा व्हावा असा ई साहित्याचा मानस आहे. मोफत पुस्तकांमुळे नवोदीत लेखकांनाही वाव मिळत आहे व वाचक संख्याही वाढत आहे. हे या ठिकाणी आवर्जुन सांगावेसे वाटते.

लेखन सामुग्री, बुध्दीचा विकास, जागतिक लोकसंख्या, वैज्ञानिक प्रगती, संगणकाचे शोध, पेन व प्रींटरचा शोध, ईत्यादी घटकांमुळे साहित्याचीही प्रगती होत आहे. करीता यापुढे थोडक्यात विज्ञानाच्या प्रगतीचा आढावा घेवू. व त्याचा साहित्याला काय उपयोग होत आहे याबाबत थोडक्यात चर्चा करू या.

.........................



# 3. विज्ञानाची प्रगती

असे म्हणतात की, Necessity is the mother of invention. म्हणजेच गरजेतून विज्ञानाची प्रगती झाली व मानवी विकास झाला. या प्रगतीमध्ये सर्व प्रकारचे शोध मानवाने लावले त्यात साहित्याचाही समावेश करता येईल.

पूर्वी लिखाणासाठी ऋषी मुनी मोराचे पीस किंवा बोरूचा वापर करीत असत त्यानंतर अगदी अलिकडे पर्यंत म्हणजेच 1965 पर्यंत दौत आणि टाकाचा वापर केल्या जात होता. आता हे शब्द व वस्तु आजच्या पिढीला कालबाहय झालेले आहेत. काळ बदलतो तसा भाषा आणि वस्तुतही बदल होत जातो. 1200 ते 1600 च्या कालावधीतील भाषा जरा निराळीच होती. मराठी भाषेतही बरेच बदल झालेले आहेत. असे म्हणतात की दर बारा कोसावर भाषा बदलत असते. आता हेच उदाहरण पहा. आजच्या पिढीला कोस हा शब्द माहीत नसावा. एक कोस म्हणजे दोन मैल अर्थात 3. 21 कि. मी.

मराठी भाषेमध्ये यापूर्वी शिवाजीच्या काळामध्ये मोडी लिपीचा वापर होत होता तोही आता लुप्त झाला आहे. या विज्ञानाच्या प्रगतीमुळे वाटरमन या शास्त्रज्ञाने जेंव्हा पेनचा शोध लावला तेंव्हापासून तर साहित्यात उत्क्रांतीच झाली असे म्हणावेसे वाटते. टाक, पेन, पेन्सिल, रबर, हायलायटर, स्केचपेन, रंगीत पेन्सिल, ब्रश, पेंटस ईत्यादी सर्व विज्ञानाचेच अविष्कार होत.

विज्ञानाची प्रगती एवढयावरच थांबत नाही तर यासोबतच इतर मशीनरी जशा छापखाने, मोठया प्रमाणावर प्रिंटींग, हे पूर्वी खिळयांचे आधाराने केल्या जात होते पण आता तर संगणकाच्या अत्याधुनिक शोधामुळे आपण कोठच्या कोठे गेलो आहोत याची प्रचीती प्रत्येकाला येत आहे.

आपण या ठिकाणी केवळ साहित्याचाच विचार गृहीत धरत आहोत पण इतरही वैज्ञानिक प्रगती प्रचंड आहे त्यामुळे काळाच्या बदलाचाही विचार आपण पुढील प्रकरणात पाहू.

.........................

# 4. काळाचा बदल

Time and tide wait for none किंवा Time is money असे आपण म्हणतो. काळ हा काहीसा काल्पनिक वाटत असला तरी तो मागे जातो व पुढे येतो असा भास होतो त्यानुरूप आपण वागत असतो. काळ आणि वेळ ही सांगून येत नाही व ती कोणासाठी थांबतही नाही असेही आपण म्हणतो. तरीपण वर्तमान काळाला विशेष महत्व आहे. सृष्टी ही चक्राकार गतीने चालते त्याचप्रमाणे आपले जीवनही चालत असावे असे गृहीत धरण्यास हरकत नाही.

काळाचा संबंध साहित्याशीही येतो. जे साहित्य यापूर्वी लिहिले गेले त्यात काळानुरूप बदलणे आवश्यक वाटते. जशी जशी मानवी सुधारणा होते तसतसे नवीन विचार आत्मसात करण्यास हरकत नाही. यासाठीच सध्या ई साहित्य निर्माण होत आहे. भलेही त्यात पूर्वीचा दर्जा आहे किंवा नाही ही बाब गौण आहे. पण असे साहित्य मात्र आजच्या काळासाठी आवश्यक आहे असे आवर्जून म्हणावेसे वाटते याला मुख्य कारण काळ बदल.

उदाहरणार्थ सोळाशे व अठराशे मधील साहित्य, कथानक, नाटके ही आजच्या पिढीला आवडतीलच याची ग्वाही देता येत नाही. ते आजच्या पिढीला कंटाळवाणे वाटत असते. आपण सर्वसामान्य चर्चेचा विचार करू. जर आपण “आमच्या काळात असे होते तसे होते, आम्ही ही वेळ पाहली असे करत होतो तसे करत होतो, इतके वाचन करत होतो आणि आता तर आजकालची मुले फक्त मोबाईलवरच वेळ घालवतात, त्यांना साहित्याची जाणच नाही” तर ती मुले निश्चितच तुम्हाला म्हणू शकतील की, “पप्पा हया फालतू गोष्टी आम्हास सांगू नका व आम्हास ऐकण्यास वेळही नाही”, पण तेच जर तुम्ही म्हटले की, “अरे तुझ्या मोबाईलवर मी एक सुंदर पुस्तक Download करून देतो ते तू जरूर वाच” तर तो लगेच इंटरनेट लावेल व चटकन esahity.com वरून पुस्तक प्राप्त करून घेईल हा या काळाचा महिमा आहे याची आपणास प्रचिती येईल.

आजकाल संगणकाएवढा अप्रतीम शोध या जगात दुसरा कोणताच नाही असे माझे मत आहे. असे म्हणतात की, या जगात सर्वात जास्त पुस्तके ही अध्यात्मिक विषयावर

होती पण आता तो रेकॉर्ड मोडला आहे व जगात सर्वात जास्त पुस्तके ही संगणक या विषयावर आहे. संगणकाचा आकार इतका लहान झाला आहे की तो मोबाईल व टॅबलेटच्या रूपात तळहातावर आला आहे.

.........................



# 5. साहित्याची आवश्यकता

A man is known by the book, he keeps. असे म्हणतात. अर्थात माणसाची पारख ही तो कोणती पुस्तके संग्रहीत करतो व वाचतो त्यावर अवलंबून असते. मानवाच्या दोन अडीच हजार वर्षाच्या वैचारिक प्रवासात बऱ्याच संकल्पना विकसित झाल्या. त्यावर अनेक प्रकारची मते-मतांतरे यांचा आढावा आपणास साहित्यातून होत असतो.

साहित्य निर्माण झाल्यानंतर त्याची आवश्यकता भासू लागली असे नव्हे तर गरजेतून साहित्य निर्माण झाले असे वाटते. माणूस हा विचारशील प्राणी आहे. त्याचे मनात सतत विचार चालू असतात पण प्रत्येक जण ते व्यक्त करीत नसतो पण जे शब्द रूपाने व्यक्त करतात त्यातूनच साहित्य निर्मिती होत असते.

मानवाला साहित्य प्रामुख्याने खालील बाबीसाठी आवश्यक आहे.

1. ज्ञानवर्धनासाठी
2. मनोरंजनासाठी
3. विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी
4. मानवी विकासासाठी
5. सामाजिक परिवर्तन व सुधारणेसाठी
6. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी
7. काळाच्या गरजानुसार ई साहित्य निर्मितीसाठी
8. पुढील पिढीसाठी मार्गदर्शन म्हणून
9. वैज्ञानिक संशोधनासाठी

अशा अनेक कारणासाठी साहित्याची आवश्यकता आहे. उपरोक्त कारणासाठी साहित्य कसे आवश्यक आहे याची थोडक्यात चर्चा करू.

1. ज्ञानवर्धन- कृष्णरचीत गीतेमध्ये असे म्हटले आहे की, " नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते. " अर्थात या जगात ज्ञानासारखे पवित्र असे दुसरे काहीच नाही. म्हणूनच आपण अगदी बालपणापासून विद्याग्रहण करतो. साधारणपणे वर्ग एक ते पदवीपर्यंत अंदाजे पंधरा वर्षात प्रत्येकी सहा विषय गृहीत धरले तरी नव्वद पुस्तकांचा अभ्यास सर्वांचाच झालेला असतो. अतिरीक्त वाचनाची सवय असल्यास महिन्याला एक असे वाचन केले तरी दरवर्षी 12 याप्रमाणे, आपणास वाचता येते तेंव्हापासून 40 वर्षाचा काळ गृहीत धरला तरी सामान्य मनुष्य 480 पुस्तकांचे ज्ञानग्रहण करू शकतो. ही बाब प्रत्येकालाच कळते परंतु सातत्याचा अभाव असल्याने एवढे वाचन होत नाही ही खेदाची बाब आहे.

Writing is a perfect man असे म्हणतात. प्रत्येक मनुष्य लिहू शकतो. प्रत्येकाच्या मनात विचार असतात. पण जेंव्हा तो लिहायला बसतो तेंव्हा काही सूचत नाही असे बरेच जण म्हणतात. याला मुख्य कारण कमी वाचन. हिंदी सिनेसृष्टीतील प्रसिध्द गायक सोनु निगम म्हणतो- मला एक गाणे म्हणावयाचे असल्यास मी दहा गाणी काळजीपूर्वक ऐकतो त्याचेप्रमाणे आपल्याला एक पुस्तक लिहावयाचे असल्यास प्रथम दहा पुस्तकांचे काळजीपूर्वक वाचन जीवनात अत्यंत आवश्यक आहे असे माझे मत आहे. हे उपदेश म्हणून मी सांगत नाही तर याची अंमलबजावणी मी माझे जीवनात करत असतो. सरासरी महिन्याला सहा पुस्तके मी वेळात वेळ काढून वाचत असतो व केवळ पुस्तकाचे नांव व लेखक लिहून ठेवतो. आतापर्यंत माझे 900 पुस्तकांचे वाचन झाले आहे व त्यानंतर मी लिखाणास सुरूवात केलेली आहे. संदर्भ ग्रंथ हाताशी घेवून लिखाण करणे ही पूर्वीची पध्दत होती आज सर्व सूज्ञ मंडळी अस्तित्वात आहेत व सर्वांचे वाचन जास्त आहे असे गृहीत धरल्यास मूळ लिखाणास बाधा येत नाही. कारण ते आपले स्वत:चे विचार असतात. हे सर्व मी साहित्याची आवश्यकता या प्रकरणासाठी सांगत आहे यात मला अहंकार प्रदर्शन करायचे नसून हे मी स्वाभिमानाने सांगत आहे. याचे प्रांजळ कारण आपणही जास्तीत जास्त साहित्याची निर्मिती करावी एवढाच आहे. आजकाल amazon. com किंवा esahity.com अशी कितीतरी वेबसाईटस उपलब्ध आहेत ज्यावर प्रत्येकजण आपले साहित्य Self Publishing व्दारा Upload करू शकतो. याची सविस्तर चर्चा पुढील प्रकरणात आपण पाहाणारच आहोत.

2. मनोरंजन- प्रत्येक माणसाला सुखाची लालसा आहे. तो सर्व ठिकाणी सुखाचा शोध घेत असतो. सुख आणि आनंद यात बराच फरक आहे. सुख हे भौतिक साधनापासून आपण प्राप्त करू शकतो पण आनंद मात्र मानसिक पातळीवरची बाब

असल्याने ती मनानेच घ्यावी लागते. खूप पैसा असला म्हणजे तो खूप सुखी आहे असे नसते तर एखादा गरीब मनुष्यही मानसिक पातळीवर सुखी असू शकतो, असा अनुभव येतो. असा आनंद मिळविण्यात साहित्याचा फार मोठा वाटा आहे असे वाटते. जर करमणूक होत नसेल तर आपण नाटके सिनेमा वगैरे पाहतो. ही तयार करण्यासाठी साहित्याचाच आधार घ्यावा लागतो. आपणास माहित आहे की वृत्तपत्रामध्ये त्याच त्या बातम्याची पुनरावृत्ती होत असते तरी सूध्दा आपली सकाळ ही मनोरंजनासाठी वृत्तपत्रापासून होते. आजकाल तर मोबाईलमुळे सर्व प्रकारच्या ताज्या बातम्या Messages येवून त्वरीत कळतात. हा ई साहित्य काळाचा महिमा होय.

3. विचारांची देवाणघेवाण :- सध्या संपूर्ण जगाचे जाळे ईंटरनेटने जोडल्यामुळे विचारांची देवाणघेवाण अतिशय वाढलेली आहे. Blog हे माध्यम अतिशय प्रसिध्द आहे. ई साहित्यामुळे नवोदीत लेखकांना भरपूर लिहायचा वाव मिळत आहे.

4. मानवी विकासासाठी :- फार पूर्वीपासून विचारवंतांनी जे साहित्य निर्माण केले ते आजही सुरक्षित ठेवले असल्यामुळे त्याचा आपण संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग घेतो याला मुख्य कारण माणूस हा अल्प कालावधीसाठी जरी जिवंत राहात असला तरी त्याचे विचार मात्र या जगात अजरामर होवून राहतात. त्याचा उपयोग निश्चितच मानवाच्या विकासा साठी होतो असे दिसते. आजही ॲरीस्टॉटल, सॉक्रेटीस, शेक्सपियर, आईन्स्टाईन तसेच भारतीय ऋषी-मुनी, संत मंडळी, वैज्ञानिक ईत्यादींचे विचार जगात अजरामर आहेत. त्यातूनच विकासाच्या वाटा मिळतात. आणि हे सर्व आज आपण ईलेक्ट्रॉनिक युगामुळे कॉम्पॅक्ट डिस्कच्या स्वरूपात सुरक्षित साठवून ठवलेले आहेत. ते ही अत्यंत कमी जागेत. यापुढे तर असा कितीतरी डेटा आपण साठवू शकतो.

5. सामाजिक परीवर्तन व सुधारणा:- असे म्हणतात की, Pen is mighter than sword याचा अर्थ जे तलवारीने होवू शकत नाही ते कधीकधी पेनाव्दारे होवू शकते हयाचा आपल्याला अनुभव आलेला आहे. यालाच जग बदलविणारी माणसे म्हणतात. अशी माणसे मात्र या जगात फार काळ टिकत नाहीत कारण जेंव्हा एखादा नवीन विचार कोणी मांडतो त्यास सहसा प्रतिसाद मिळत नाही कारण पूर्वीची री ओढण्याची माणसाची सवय काही केल्या लवकर जात नाही. म्हणूनच तर वैज्ञानिक प्रगतीच्या वेगात मानवी मनाचा विकास तितक्या वेगाने होत नाही असे आढळते.

6. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी:- आज अंधश्रध्देवर कितीतरी पुस्तके उपलब्ध आहेत पण मनावर जो पगडा बसलेला आहे तो सहसा सुटत नाही करीता नवीन ई साहित्याची आजच्या पिढीला फार आवश्यकता आहे असे माझे मत आहे. तेंव्हा सर्वांनी हे नवीन ई साहित्य वाचलेच पाहीजे असा माझा आग्रह आहे.

7. काळाच्या गरजानुसार ई साहित्य निर्मितीसाठी:- आपण साहित्याची आवश्यकता या विषयावर चर्चा करीत आहोत. सध्याच्या काळानुरूप साहित्याचा ओघ किंवा प्रवाह हा बदलत चालला आहे. आजच्या ईलेक्ट्रॉनिक युगात साहित्य हे डायरेक्ट संगणकावर तयार होत आहे मग ते ब्लॉगच्या स्वरूपात असो की, संगणक टायपिंग स्वरूपात असो. आता खिळयाची प्रिंटींग पध्दत अस्तित्वात नाही ही समूळ नष्ट झाली आहे. त्यामुळे साहित्य निर्मितीचा वेगही वाढला आहे. तसेच Copy, paste चा जमाना आला असल्याने वाङमय चौर्याचे प्रकारही वाढले आहेत तरी काही का असेना एकंदरीत साहित्यात वाढ झाली हे मात्र निश्चितच.

8. पुढील पिढीसाठी मार्गदर्शन म्हणून:- हा विचार जरासा वादातीत आहे कारण आजच्या लोकांना मार्गदर्शनाची गरजच नाही असे कधी कधी वाटते. Every man in his humour अशी परिस्थिती आहे. विशेषत: विद्यार्थी तर ऐकत नसल्याचे बरेच पालकांची तक्रार आहे. अहो ते कसे ऐकतील मोबाईलचा जमाना आहे. त्यांना मोबाईलची भाषाच कळते तेंव्हा त्यांना ई साहित्याकडे वळवा ना ! आम्ही नवोदीत लेखक आहोतच त्यांना साहित्याचे खादय मोफत देण्यास. असो, हा विनोदाचा भाग जरी आपण सोडला तरी यापुढे ई साहित्याचा रोल पुढील पिढीच्या मार्गदर्शनासाठी निश्चितच होईल असे वाटते.

9. वैज्ञानिक संशोधनासाठी:- कोणतेही वैज्ञानिक शोध लागल्यानंतर त्यापूर्वीची पार्श्वभूमी हि अत्यंत महत्वाची ठरते. त्या पूर्वसाहित्य व पूर्वसंशोधनावर आधारीतच तो शोध पूर्ण होतो मग त्याला त्याचे जनकत्व प्राप्त होते. आज आपण पाहतो आहोत की, संगणकाची मूळ कल्पना चार्लस बॅबेज याला जरी आली असली तरी काही संशोधन कमतरतेमुळे आजपर्यंत तो शोध पूर्ण होण्यास चारशे वर्षाचा कालावधी लागला. आणि आज आपण त्याचा पुरेपूर फायदा घेत आहोत. करीता अशा संशोधनासाठी संदर्भग्रंथ व साहित्याचा अत्यंत मोलाचा ठेवा आहे असे वाटते.

# 6. ई साहित्य

ई साहित्य म्हणजे थोडक्यात ई बुक्स. अशा प्रकारची पुस्तके ईलेक्ट्रॉनिक उपकरणावर वाचता येतात. उदाहरणार्थ ॲण्ड्रॉईड मोबाईल, टॅबलेट्स, लॅपटॉप व पर्सनल संगणक. ई बुक हे पूर्णपणे डिजीटल फॉरमॅटमध्ये रूपांतरीत करून प्रकाशीत करण्यात येते व ते वाचण्यासाठी मुख्यत्वेकरून PDF Format मध्ये सुरक्षित ठेवण्यात येते कारण एकदा PDF Format मध्ये रूपांतरीत केल्यानंतर त्यात बदल करता येत नाही. बदल करण्यास विशिष्ट सॉफ्टवेअरची आवश्यकता असते. विकत घेतलेली ई पुस्तके वाचण्यासाठी त्या त्या माध्यमांनी विशिष्ट प्रकारची स्वत:ची ई रीडर्स तयार केलेली आहेत. त्यात प्रामुख्याने ॲमॅझॉन कंपनीचे किंडल रीडर, कोबो रीडर, ई बुक रीडर, तसेच Rock Stand, News Stand, Flipkart e books, Readwhere ईत्यादींनी स्वत:चे Reader apps तयार केलेले आहेत. तुमच्या Loggin ID मुळे ते Cloud Storage वर सुरक्षित ठेवलेली असतात. या सर्व रीडर्सवर मोफत पुस्तकेही वाचावयास मिळतात, हे विशेषच.

ईलेक्ट्रॉनिक माध्यमामुळे ई साहित्याचा प्रचार व वाचन एवढे झपाटयात वाढत आहे की, सन 2013च्या तुलनेत युनायटेड स्टेट्समध्ये प्रौढ वाचकांची शेकडेवारी 23 % वरून 28 % वर गेलेली आहे. ही संख्या नंतर पन्नास टक्यावर गेली कारण अमेरीकेत Dedicated Devices म्हणजेच Kindle Reader सारखी उपकरणे सहज उपलब्ध होती. याउलट आपल्या भारतात ते Kindle Reader अलिकडे उपलब्ध झालेले आहे.

ई साहित्याच्या थोडे पूर्वेतिहासाकडे आपण वळलो तर असे लक्षात येईल की, ई रीडरची सर्वप्रथम कल्पना Bob Brown यांना 1930 मध्ये त्यांनी स्वत: तयार केलेल्या ध्वनीमुद्रीत सिनेमावरून त्यास आली असे विकीपीडीया मध्ये नमूद आहे. त्यांना असे वाटत होते की अशा या यंत्रामुळे बरेच प्रिंट झालेले साहित्य लोकांपर्यंत जावू शकते त्यामुळे त्यांनी सदर कल्पना त्यांच्या " The Readies" या ग्रंथात नमूद केली आहे. परंतू या कल्पनेला

1930 नंतर कोणीही प्रतिसाद दिला नाही. याबाबत Jennifer Schuessler हीने असे मत मांडले होते की, ब्राऊनच्या म्हणण्यानुसार अशा रीडरमुळे शब्दांचा आकार, कागदांची कटाई, झाडांचे संरक्षण ईत्यादी बाबी नियंत्रित होवू शकतात. त्यास वाटत होते की ई रीडरमुळे वाचन जगतात पुनरूज्जीवन निर्माण होवू शकते.



थोडक्यात, ई बुकच्या पहिल्या संशोधकास सर्वानुमते मान्यता नसली तरी काही महत्वाच्या मंडळीनी मात्र ही बाब उचलून धरली. यात प्रामुख्याने Roberto Busa (late 1940), Angela Ruiz Robles (1949), Doug Englebart and Andries van Dam (1960), Michael S. Hart (1971). ही मंडळी होती. हार्टने 1971 ला ईलेक्ट्रॉनिक डाक्युमेंटसला स्वातंत्र्याचे प्रतिज्ञापत्र तयार केले व त्यांनंतर मात्र प्रोजेक्ट Gutenberg ला सुरूवात झाली. याचे मुख्य कारण केवळ एवढेच होत की, वैयक्तिक संगणकावर प्रत्येकाला ईलेक्ट्रॉनिक प्रतीमध्ये सर्व साहित्य उपलब्ध व्हावे.

त्यामुळे पहिले ई पुस्तक रॉबर्ट बुसा यांनी 1949 ला तयार करण्याची सूरूवात केली असली तरी ती पूर्ण होण्याच्या प्रक्रियेसाठी 1970 साल उजाडले व ते अखेरीस पूर्ण झाले. हे एकाच कॉम्पुटरवर स्टोअर केले होते आणि याचे CD-ROM version 1989 ला दृश्य स्वरूपात आले. तथापि अशा प्रकारचे Text हे केवळ

अभ्यासासाठी असल्याने किंवा प्रयोगातीत असल्याने ते प्रकाशीत हक्कात येत नस्ल्याने नंतर ते 2005 ला Online स्वरूपात प्रकाशीत करण्यात आले.

1949 मध्ये मात्र Angela Ruiz Robles या शिक्षिकेने स्पेन देशातील गॅलिसीयामध्ये पहिल्या ईलेक्ट्रॉनिक पुस्तकाचे Patent मिळविले होते. हे विशेष. ई पुस्तकाचा शोधक म्हणून, खरी मान्यता मात्र मायकेल हार्टलाच 1971 ला मिळाली होती. 1992 मध्ये सोनी कंपनीने Data Discman नावाचे पहिले ई बुक रीडर तयार केले होते. त्यानंतर याबाबत बरीच प्रगती होत गेली व 2010 मध्ये Amazon. com ने Kindle DX International edition जगभर प्रसिध्द केले. यामुळे लाखो करोडो वाचकांची वाचनाची तृप्ती होत आहे. करीता ई साहित्य हे जीवनात सध्या किती उपयोगाचे आहे हे आपणास कळून आले असेलच. ई साहित्याबाबत सविस्तर माहिती वाचण्याची ज्यांची जिज्ञासा असेल त्यांनी मी लिहिलेले "Digital Reader- A Need of an Hour " हे पुस्तक आवर्जुन वाचावे. सदर पुस्तक हे amazon. in वर केवळ रूपये 49/- मध्ये उपलब्ध आहे पण ते किंडल फॉर्मॅटमध्ये असल्याने किंडल रीडरवर वाचता येवू शकते. Kindle Reader हे ॲप सूध्दा आहे त्यामुळे काळजीचे कारण नाही तसचे आपण जर Kindle Subscriber असाल तर हे पुस्तक उधार घेवून मोफत वाचण्याची पण सोय आहे. आता लोकांचा कल आजकाल काय आहे हे आपण पुढील प्रकरणात पाहाणार आहोत.

# 7. लोकांचा वाचन कल

"व्यक्ति तितक्या प्रकृती" या उक्तीनुसार किंवा "स्वभावो दुरतीक्रम:" यानुसार प्रत्येक व्यक्ति आपापल्या मूडमध्ये असते. असंख्य काळापासून साहित्याचा उगम झाला असला तरी प्रत्येकाला काहीतरी नवीन वाचावयास मिळावे असे वाटते. बरेचदा मुलांना याच कारणास्तव अभ्यास आवडत नाही. वाचनाचे खरे कारण तर मनोरंजन हेच आहे तरीसूध्दा रूचीपालट म्हणून नवीन लेखक काय लिहितात याकडे बरेच वाचकांचा कल दिसून येतो. पूर्वी वाचन म्हणजे वाचनच असायचे आजकाल तसे नाही तर अत्याधुनिक यंत्रांमुळे वाचतांनाच ऐकण्याची व पाहण्याची सोय आहे. जसे की, एखादे गाणे आपण टीव्हीवर पाहतो त्याचे टायटल वाचतो व तेच आपण ऐकतो असा तिहेरी संगम आपण अनुभवित असतो. हीच बाब साहित्याच्या बाबतीतही लागू पडते. जे साहित्य आपण प्रथम Hard copy च्या स्वरूपात वाचत होतो त्याच्या ईलेक्ट्रॉनिक प्रतीवर आपल्याला किती गोष्टी मिळतात ते पाहू.

पुस्तक वाचतांना थांबायचे असल्यास पानाला मोड पाडणे ही बाब आता ईलेक्ट्रॉनिक प्रतीवर बुकमार्क वापरून करता येते. हुबेहूब पान मोडण्याची कृती जशीच्या तशी कोबो रीडरवर करता येते. ईंग्रजी पुस्तके वाचतांना एखादा शब्द व त्याचा अर्थ समजला नसल्यास त्याचे डोक्यावरच अर्थ दिसण्याची सोय किंडल रीडरमध्ये केलेली आहे. याशिवाय एकच पुस्तक निरनिराळया डिव्हाईसवर वाचलेल्या पानांच्या पूढे वाचण्याची सोय ही Book synchronisation मुळे सहज शक्य होत कारण आजकाल तुमच्या लॉगींग आयडीमुळे असे करणे ईलेक्ट्रॉनिक उपकरणाव्दारे करता येणे शक्य असते. याव्यतिरीक्त हायलायटर, नोट्स काढणे, फिडबॅक देणे, आवडलेल्या वाक्यास अंडरलाईन करणे, शब्दांचा आकार लहान मोठा करणे अशा कितीतरी बाबी अद्ययावत संगणकामध्ये तसेच टॅबलेट व मोबाईलवर सध्या Android operation पध्दती मुळे शक्य होते ही आजच्या काळाची नवल विशेष बाब होय. अशा असंख्य कारणामुळे आजच्या पिढीचा कल ई साहित्य वाचनाकडे प्रचंड वेगाने होत राहील यात तिळमात्रही शंका नाही.

आपण एखादे वाचनालय मोठया उत्सुकतेने लावतो पण सर्वांना काय अनुभव येतात की जी पुस्तके ज्यांना वाचावयाची आहे तीच नेमकी मिळत नाही किंवा त्या



वाचनालयाचा ग्रंथपाल आपणास आंतमध्ये प्रवेश करू देत नाही कारण त्याची अशी कल्पना असते की, सर्वसामान्य माणूस पुस्तकांना विस्कळीत करेल. अर्थात त्याचेही काही चूकत नाही पण आपली आवड जशीच्या तशी मावळते व त्यांनी आपल्या पुढयात टाकलेली पुस्तकेच वाचण्यात आपले आयुष्य खर्ची घातल्या जाते. याबाबत एक गंमत सांगतो. एका मोठया लायब्ररीच्या समारंभामध्ये मी उपस्थित होतो त्यात प्रामुख्याने आंध्रकडील मातब्बर मंडळी होती त्यांनी आपल्या वाचकांना प्रश्न केला की आपणास काही अडचणी असल्यास कृपया इंग्रजीमध्ये सांगावे. एक महाशय उभे झाले व म्हणाले की सर In our library, many books are untouchables. ते आंध्रवाले प्रथम हसले. हसण्याचे कारण आपणासही समजले आहेच. पण बिचाऱ्याला काय म्हणावयाचे होते ते त्यांना कळले व ते म्हणाले. Actually the books are not untouchables. That are not being touched, by you, due to wrong systems of today's libraries.

मित्रांनो अशी भाषेबाबत आपली स्थिती कां होत असते याचे कारण आपण समजले असालच की केवळ कमी वाचन. भाषा कोणतीही असो, ती आत्मसात करावयाची असल्यास जास्तीत जास्त वाचनाचा कल  फार आवश्यक आहे एवढेच मला आवर्जून सांगावयाचे आहे.

........................

# 8. वाचन प्रवाह व उपकरणे

लोकांचा वाचन कल या प्रकरणामध्ये आपण हे पाहले की जास्तीत जास्त वाचक हे ईलेक्ट्रॉनिक युगाकडे कां वळले आहेत. असा वाचनाचा प्रवाह हा मॉडर्न युगाकडे जातो आहे. तेंव्हा काही पुस्तके वाचता येणाऱ्या उपकरणाची (Softwares) माहीती बघू.

1. किंडल रीडर- (Kindle Reader) हे उपकरण (Device) सध्या भारतात amazon. in वर विकत घेण्यासाठी उपलब्ध आहे. कमीतकमी रूपये 5999/-, 8999/- व 12999/- या किंमतीमध्ये ते ऑनलाईन घरपोच मिळू शकते. त्याची बॅटरी सात दिवसपर्यंत चार्ज करण्याची गरज नसते. ते पेपर व्हाईट असल्याने डोळयावर वाचतांना कोणताही ताण येत नाही. आता तर नाईट व्हीजन सारखी उपकरणे तयार करण्यात आली आहेत. शिवाय त्यामध्ये चार जीबीपर्यंत पुस्तकांची साठवण करता येते. हे उपकरण वाय फायवर जोरात चालते पण थ्रीजी वरही रन होवून पुस्तके विकत घेता येतात किंवा लाखो मोफत पुस्तकेही आपणास वाचण्याची यांत सोय आहे. एका एमबी जागेत (1000 KB) साधारणत: दोन पुस्तके टेक्स्ट स्वरूपात मावू शकतात. पुस्तक जर पी डीएफ मध्ये असेल तर एक पुस्तक अशा प्रकारे आपण साधारणत: 4000 ते 8000 पुस्तके तळहातावर ठेवू शकता. आणि एवढा साठा वाचावयास 150 वर्षाचे आयुष्य आवश्यक आहे. मला आतापर्यंत नवशे पुस्तके वाचावयास बावीस वर्षाचा काळ लागला आहे.

ज्यांना हे रीडर विकत घ्यावयाचे नाही त्यांचे करीता किंडल रीडर नावाचे ॲप सूध्दा उपलब्ध आहे पण त्यावर ती मजा येणार नाही. या रीडरमध्ये मी आपणास मागील प्रकरणात सांगितलेल्या सर्व सोयी उपलब्ध आहेत.

2. KOBO रीडर:- प्रथम Flipkart e book हे ॲप पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध होते पण सध्या त्यांनी सर्व अधिकार हे कोबो रीडरला दिल्यामुळे, पुस्तके महागात मिळू लागली आहेत.

3. PDF रीडर:- हे सर्वांना माहीत असलेले सॉफ्टवेअर आहे ज्यावर केवळ पीडीएफ फॉर्मेटचीच पुस्तके वाचता येतात. हे रीडर सर्व मोबाईलमध्ये Inbuilt आहे.

4. Rock stand ॲप व रीडर:- या ॲपवर विशेषत: विदयार्थ्यांसाठी बरीच शालेय व महाविदयालयीन पुस्तके मोफत उपलब्ध आहेत.

5. News stand reader:- यावर वृत्तपत्रासोबत ई बुक्स वाचण्याचीही सोय आहे. यावर अत्यंत स्वस्त पुस्तके उपलब्ध आहेत. तसेच विकत घेण्याची सोयही फार सोपी केलेली आहे. पैसे आपोआप आपल्या मोबाईल बीलवरून कटतात.

6. Readwhere ॲप:- या ॲपवर जास्तीत जास्त मासिके कमी दरात उपलब्ध आहेत. या व्यतिरीक्त असे अनेक पुस्तकांचे स्वतंत्र ॲप असून ते स्वत: रीडरचे काम करतात.

या व्यतिरीक्त ईबुक रीडर, एफबी रीडर, अशी अनेक Applications Android फोनवर उपलब्ध आहेत फक्त आवड असली सवड आपोआपच मिळेल.

सर्वात महत्वाची आपली ई साहित्य वेबसाईट (esahity.com) यावर कोणतीही झंझट नाही. सरळ साईट उघडा आणि आवडत्या कां? सर्वच पुस्तकांवर केवळ क्लिक करा. पुस्तके थेट आपल्या मोबाईलवर हजर. या साईटवर माझी आगामी सर्व पुस्तके प्रकाशीत होत आहे ती सूध्दा पूर्णपणे मोफत. आपण वाचा व केवळ प्रतिक्रिया पाठवा. किंवा विषय सुचवा. नकारात्मक प्रतिक्रियांचे स्वागत मी फार आनंदाने करीत असतो कारण त्यामुळे माझे लिखाणात सुधारणा तरी होईल.

या प्रकरणाला संपविण्यापूर्वी मी ई साहित्य टीमचे परत एकदा अत्यंत आनंदाने आभार मानतो. मला आतापर्यंत मुलुंड, सोलापूर, जळगांव अशा अनेक ठिकाणावरून प्रतिसाद मिळाला आहे याबाबत मी सर्व वाचकांचे मन:पूर्वक आभार मानून हे प्रकरण संपुष्टात आणतो.

........................

# 9. पुढे काय

पुढे काय!  खरं तर हे कोणीच सांगू शकत नाही. पण कधी कधी मनाला असे वाटते की या ई साहित्याच्या आधारे आपली मराठी भाषा ही जागतिक पातळीवर जायला वेळ लागणार नाही. नवीन टेक्नॉलॉजी ही पुढे येणे चालूच राहणार. सूज्ञ वाचकांची संख्याही वाढत राहणार. ऑडीओ बुक्सची निर्मिती होत राहणार. पिढी बदलेल पण साहित्य मात्र "यावत्चंद्रदिवाकरौ" अमर राहील. वाचक असो वा नसो पण निर्माण झालेले साहित्य कदापि ही नष्ट होणार नाही.

यापुढे वैज्ञानिक प्रगती खूप झाली तर दुसऱ्या ग्रहावरचे लोकही येथे येतील आणि आपली भाषा ग्रहण करतील. ज्ञान आणि कर्म हे माणसाच्या मृत्युनंतरही कायम राहतात असे म्हणतात. कारणामुळे कार्य घडत राहणार व पृथ्वीवरील लोकांचाही विकास होत राहणार.

आपण या सर्व भानगडी करतो ते केवळ आपल्याला व ईतरांना सुख मिळण्यासाठी. जन्म व मृत्यच्या या कालप्रवाहात मनुष्य हा एक बुडबुडा आहे पण प्रत्येकाने केलेली कामगिरी ही त्याचे माघारी तशीच राहते. आज जगात 13 कोटीच्या आसपास पुस्तके आहेत आणि आज तर एवढे साहित्य केवळ ईलेक्ट्रॉनिक माध्यमावर साठवून ठेवता येते ही फार आनंदाची बाब आहे.

आज आपणास कल्पना आहे की Britannica Encycloapedia सारखे

विश्वकोशाचे हार्ड कॉपीतील मुद्रण बंद करण्यात आले आहे व ते केवळ सिडीच्या किंवा डीव्हीडीच्या स्वरूपात अस्तित्वात आहेत. याला मुख्य कारण असे अवाढव्य साहित्य कमी जागेत साठविता येतात. एका एमबीमध्ये एक पुस्तक म्हणजेच एका जीबीत एक हजार याप्रमाणे एका डबल लेअर डीव्हीडीमध्ये साडेआठ जीबीत साडेआठ हजार, अर्थात एक लाखपुस्तकांना केवळ 12 DVD लागतील. याचाच अर्थ जगातील आजची सर्व पुस्तके साठविण्यास फक्त 15600 DVD पुरेशा आहेत. केवढी ही प्रचंड वैज्ञानिक प्रगती. आणि याचा जर कोणी फायदा घेत नसेल तर त्याचेसारखा दुजा न कोय !

# 10. मराठी जगत

देव लोकांच्या संस्कृत भाषेवरून आपल्याला प्राकृत भाषेवर आणणारे संत श्री. ज्ञानेश्वर महाराज, त्यानंतर मराठीचा प्रचार करणारे महाराष्ट्रातील सर्व संत मंडळी, शिवाजीच्या काळापासून चालत आलेली आपली मोडी भाषा व विकासानंतर आजपर्यंत विकसीत सध्याची मराठी भाषा ही जर अभिमानाने पुढे न्यावयाची असेल तर मराठी जगताला जागतिक पातळीवर नेण्याचे भव्य काम करणे हे आपले सर्व मराठी बांधवाचेच कार्य आहे.

आम्हा मराठीची बोल कौतुके........ या उक्तिला प्रणाम करू या. छत्रपती शिवाजीने मराठयांचा परीचय व धाक दिल्ली पर्यंत पोहोचविला व मग आपण कमीतकमी मराठी भाषा तरी जोपासू या. आपल्याच महाराष्ट्रात येवून आपली भाषा बिघडविणारे महाभाग खूप आहेत तसेच ईंग्रजीचा पगडा तर घरोघरी पसरला आहे व आपलीच मुले आपल्याला मराठी शब्दांचा अर्थ विचारतात यापेक्षा दुर्दैव ते कोणते.

मध्यप्रदेशात अभियांत्रिकी शिक्षण सुध्दा त्यांचे हिंदी भाषेतून दिल्या जाते पण आपल्या महाराष्ट्रात मात्र कोणीही अभ्यासक्रम मराठीत करीत नाही. आएएस परीक्षांना सुध्दा अशा अटी आहेत की, प्रश्न जरी इंग्रजीत असला तरी आपण उत्तर मात्र आपल्या मातृभाषेत देवू शकतो.

ब्रिटानिका एन्सॉयक्लोपिडीया सारखे आपल्या मरीठीमध्ये मराठी विश्वकोश तयार करण्यात आले आहेत व त्या खंडांची किंमत अतिशय कमी असून कोणीही ते घेण्यास आपल्या पाल्याला चाळायला देण्यास उत्सुक नाहीत. तेच खंड सिडीच्या रूपात ही उपलब्ध आहेत याची कोणी तसदी घेतली आहे काय? साधारणपणे एका 250 पानाच्या पुस्तकाची किंमत रूपये 300/- असते पण 1000 पानाच्या मराठी विश्वकोशाची किंमत केवळ 250/- असते ही जाणीव मराठी माणसाने ठेवावी व जास्तीत जास्त साहित्य वाचावे ही कळकळीची विनंती. या विश्वकोशाची मराठी सिडीची किंमतही केवळ रूपये 900 एवढी आहे.

सांगण्याच तात्पर्य एवढेच की मराठी जगताला पुढे न्यायचे असेल तर किमान ई साहित्य डॉटकॉमवरील तरी साहित्य वाचावे. हे पंचेचाळीस पानाचे पुस्तक वाचण्यास आपणास केवळ 40 मिनिटे लागतील पण मला हे लिहावयास मात्र चाळीस दिवस लागलेत.

व्हाट्सअॅप किंवा फेसबुकवर गप्पा मारण्यापेक्षा साहित्य वाचणे हा छंद केव्हाही चांगला असे माझे प्रांजळ मत आहे.

# 11. प्रतिसाद

मराठी भाषेमध्ये ई साहित्याचा उगम esahity.com तर्फे करण्यात आला आहे. पाहता पाहता या अल्पशा काळात वाचकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. मराठी वाचकांमध्ये जिज्ञासा व लालसा उत्पन्न व्हावी असा हा उपक्रम आहे. यात प्रामुख्याने नवोदीत लेखकांनाच प्रवेश आहे व असे साहित्य मोफत उपलब्ध असल्याने त्याचा दर्जा फारसा नसावा असा काहींचा गैरसमज आहे. तो वाचकांच्या प्रतीसादामुळे मोडकळीस आला आहे.

माझा स्वत:चा असा अनुभव आहे की, मला विशेषत: पश्चिम महाराष्ट्राकडून अत्यंत प्रतिसाद  मिळत आहे. जेंव्हा त्यांचे फोन येतात तेंव्हा असे वाचक स्तुतीसुमनांचा वर्षाव करतात, त्यावेळी खरोखरच भरभरून येते. काही वाचक सूचना तर काही थोडासा खरपूस समाचारही, तर काही माझी परीक्षाही घेण्याचा प्रयत्न करतात की सर आपण हे वाचले काय ते वाचले काय वगैरे पण अशा बाबींचा मला कधीच राग येत नाही उलट यामुळे मला माझे लिखाणामध्ये सुधारणा करण्यास वाव मिळतो तेंव्हा अशाही प्रतिक्रियांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

माझे वाचन व लिखाण याचे प्रमाण काहीसे 40 पुस्तकाला एक असे आहे. सध्या असाच एक प्रश्न एका जवळच्या मित्राने गमतीने विचारला. तू पुस्तक लिहितांना कसे लिहितो. संदर्भग्रंथ वगैरे जवळ ठेवतो काय वगैरे. मूळ प्रत हाताने व शाईने लिहीतो काय अशा अनेक प्रश्नांचे उत्तर मी येथेच देतो.




मित्रांनो, मी प्रथम खूप वाचन करतो व लिहितांना मात्र संदर्भ ग्रंथ न घेता स्मरणात जे आहे त्याचाच वापर करतो. सध्या माझे वय 61 असल्याने मी शाई पेन वापरत नाही तर सरळ संगणकावर मराठीमध्ये टाईप करतो त्यामुळे वेगही वाढतो व विचारही करायला वेळ मिळतो. मी उपविभागीय अधिकारी असतांना फावल्या वेळामध्ये हे मराठी टायपिंग शिकलो. आज उतार वयात त्याही कलेचा फायदा होत आहे नाहीतर मी अभियंता आहे, टायपिंगसारखी कामे कशाला करू असे जर ठरविले असते तर मी आज लहानसाही लेखक बनू शकलो नसतो.

दुसरा आक्षेप माझ्या मराठीमध्ये काही हिंदी व ईंग्रजी शब्दांचा समावेश जास्त असतो याला मुख्य कारण माझे वाचन जास्त ईंग्रजीतून आहे व मी विदर्भाचा असल्याने आमचेकडील भाषा पश्चिम महाराष्ट्रासारखी शुध्द नाही हे मी प्रांजळपणे कबूल करतो. Sorry, मान्य करतो.

..............................

# 12. ई साहित्य काळाची गरज

आता आपण पुस्तकाच्या मथळयाकडे वळू. आपण हे पुस्तक काळजीपूर्वक वाचलं असेलच. सध्याच्या वैज्ञानिक युगातील ई साहित्याकडे आपला कल कां असावा या दृष्टीने मी आपणास वळविण्याचा प्रयत्न केला आहे तो कितपत यशस्वी होईल हे आजचा साहित्य काळ व आपण सूज्ञ वाचकच ठरवाल ही आशा बाळगतो.

या आशयाचे पुस्तक मी प्रथम ईंग्रजीमध्ये लिहिलेले आहे हा उल्लेख यापूर्वी मी दिला आहे व ते amazon. in वर असल्याचे ही नमूद केले आहे. प्रश्न एवढाच आहे की आपण ते आवर्जून वाचावे त्या पुस्तकाची किंमत अतिशय कमी ठेवेलेली आहे वास्तविक ॲमॅझॉनवर कमीत कमी 2. 99 $ म्हणजेच रूपये 199 ठेवावी लागते हा त्यांचे स्टेटसचा प्रश्न आहे.

तेंव्हा चला, सर्व जण ई साहित्याला काळाची गरज मानू या व या वेबसाईटला प्रचंड प्रतिसाद देवू या. आपणास माहित असलेल्या दहा मित्रांचे ई मेल पत्ते या वेबसाईटला पाठवा व आपल्या मराठी भाषेचा स्वाभिमान जागतिक पातळीवर पोहचवू या.

धन्यवाद !

..........................................



# संदर्भ

1. Digital Reader- A Need of an Hour- Prakash M. Raut, Amravati

2. Wikipedia. org

3. Gutenberg. org

4. statistics from Internet source

5. My reading of 900 books, from 1994 to 2016.

...............................................

# लेखक परिचय



श्री. प्रकाश माणिकराव राऊत हे सध्या पाटबंधारे विभागातील सेवानिवृत्त उपविभागीय अधिकारी आहेत. जन्म 1955 ता. वणी जिल्हा यवतमाळ. त्यांचे माध्यमिक शिक्षण शासकीय पब्लीक स्कूल, चिखलदरा येथे पूर्ण झाले त्यानंतर त्यांनी 1977 मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी पदविका प्राप्त केली. पण लिखाणाचा छंद जोपासण्यासाठी 1996 मध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून कला स्नातक ही पदवी, ईंग्रजी साहित्य व मानसशास्त्र हे विषय निवडून प्रथम श्रेणीत प्राप्त केली.

तसेच अतिरीक्त छंद म्हणून भारतीय योग विद्याधाम नाशिक येथून योग शिक्षक ही पदविका प्राप्त केल्यानंतर समाजसेवा म्हणून अमरावती येथे तीन वर्षे योगाचे वर्ग तसेच शासकीय तंत्र निकेतनात योगवर्ग व विदर्भात अनेक ठिकाणी योगावर भाषणे ईत्यादी उपक्रम विनामूल्य केलेले आहेत.

विनोदी स्वभावाचे प्रकाश राऊत हे त्यांचे मित्रवर्गात अगदी मनमिळावू होवून जातात. त्यांची पुस्तके सध्या ई साहित्य प्रतिष्ठान व प्रकाशनातर्फे मोफत प्रसिध्द केल्या जात आहेत.

“वाचकांचा आनंद हेच माझे लिखाणाचे कारण” असे ते म्हणतात.

..................................